# प्रकरण – चौथे

# कोल्हापूर राज्य व पन्हाळा

# (१७१०–१८४४)

## प्रकरण – चौथे

# कोल्हापूर राज्य व पन्हाळा (१७१०–१८४४)

### प्रस्तावना :–

दक्षिण महाराष्ट्रातील पन्हाळगड हा मराठ्यांच्या इतिहासातील अनेक महत्वपूर्ण घटनांचा साक्षीदार आहे. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर प्राप्त परिस्थितीत औरंगजेबाने मराठे सत्तेचा ताबा मिळवण्यासाठी निकराचे प्रयत्न केले. पण या काळात मराठी राज्याची धुरा महाराणी ताराबाईनी उचलली. औरंगजेबाच्या आक्रमणास त्यांनी यशस्वीरित्या तोंड दिले. शाहूराजांच्या सुटकेनंतर महाराणी ताराबाई व शाहूराजे यांच्यात संघर्षाला पुन्हा सुरुवात झाली. यातूनच महाराणी ताराबाईनी इ. स. १७१० मध्ये पन्हाळगडावर आपला पुत्र शिवाजीराजे यांच्या छत्रपती पदाची द्वाही फिरवली. व नंतर पन्हाळगडावर मराठ्यांची दुसरी राजधानी निर्माण केली.

इ. स. १७१४ मधील पन्हाळगडावरील सत्तांतर, राज्यक्रांती मागे कोण? पन्हाळगडावरील सत्तांतर कधी घडले असावे? संभाजीराजे पहिले यांच्या काळातील पन्हाळयावरील घटना, जिजाबाईकालीन पन्हाळा, महादजी शिंदेची कोल्हापूरवर स्वारी (इ. स. १७७७), यशवंतराव शिंदेना पन्हाळयावर मारण्याचा कट, राजधानी पन्हाळा ते करवीर, रामचंद्र पटवर्धनांची कोल्हापूरवर स्वारी (इ. स. १७९९), इ. स. १८४४ चे गडकऱ्यांचे बंड, पन्हाळगड एक पर्यटनाचे ठिकाण इत्यादी मुद्यांची चर्चा या प्रकरणात करण्यात आली आहे.

### पहिले शिवाजी :– (इ. स. १७०० ते १७१४)

इ. स. १७१० मध्ये पन्हाळा येथे राजाराम महाराजांचे पुत्र शिवाजीराजे यांच्या नावाने छत्रपती पदाची द्वाही महाराणी ताराबाईनी फिरवली आणि मराठ्यांची नवीन गादी पन्हाळा याठिकाणी स्थापन केली. ताराबाईचा पुत्र शिवाजी यांचा कोल्हापूरचे पहिले छत्रपती शिवाजी असा उल्लेख इ. स. १७१० नंतर होऊ लागला.

पन्हाळयाला शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेका नंतर शाहू महाराज व महाराणी ताराबाई यांचा संघर्ष आणखी वाढला. याचा फायदा मोगल सरदार हुक्केरीत इलाचीबेग, मिरजेत दिलेरखान, कऱ्हाडात पडदूल्लाखान हे नेहमीच करुन घेत असत. तसेच कृष्णेच्या उत्तरेस शाहू महाराजांचा अंमल होता. तर कोल्हापूरच्या दक्षिणेस कर्नाटकात सावनूरच्या नवाबाचे राज्य होते. व कित्तूर, चिक्कोडी, नवलगूंद, डबंळ वगैरे ठिकाणी देसाई एखाद्या स्वतंत्र राज्याइतके बळकट होते. त्यामुळे इ. स. १७१०–११ च्या सुमारास पन्हाळयाचे राज्य चोहोकडून मर्यादित व बंदिस्त झाले होते.[१]

## पन्हाळगडावरील रक्तशून्य राज्यक्रांती :–

महाराणी ताराबाई व शाहूराजे यांच्यामधील सत्तास्पर्धेचे राजकारण हे सुरु होते. इ. स. १७१२ नंतर ताराबाईच्या पक्षाच्या दृष्टीने काही प्रतिकूल घटना घडल्या. प्रत्यक्ष सत्तांतर घडले त्यावेळी ताराबाईचे सामर्थ्य ज्याच्यांवर अवलंबून होते असे सर्व सेनानी त्यांना सोडून गेले. यात चंद्रसेन जाधव, दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, संताजी घोरपडे, हैबतराव निंबाळकर या मंडळींनी निजामाचा पक्ष स्विकारला. शाहूराजे व ताराबाई यांच्या संघर्षात कोणाचाच निर्णायक विजय होत नव्हता. त्यामुळे सरदार स्वतःच्या फायदयासाठी एकदा ताराबाईची तर एकदा शाहूराजांची बाजू घेत असत.

ताराबाईला या काळात रामचंद्रपंताचा आधार होता असे वाटत होते. पण रामचंद्रपंताच्या पुढच्या वागणुकीवरुन त्यांच्याविषयी शंका वाटत होती. यांच्यामध्ये इ. स. १७१०–१२ च्या दरम्यान शाहूराजे व रामचंद्रपंत यांच्यामध्ये एक गुप्त करार झाला असावा असा निष्कर्ष काढता येतो. या कराराच्या शेवटी स्वतः शाहू महाराजांनी असे लिहले होते 'लिहल्या प्रमाण वर्तनूक केली जाईल यास आतराय न होय. तुमी आलीयार्व चालऊ यास आतर करु तर आम्हा सपत असे.' असे त्यांनी पंतास अभिवचन दिले होते.[२]

यावरुन पंताचा विचार शाहूस अनकूल होता हे स्पष्ट होते. तरीही ताराबाईना आपल्या पक्षाला बळकटी आणण्यास पंताची गरज होती. पंतांना ही एकनिष्ठ राहण्याचे ठरविले होते.

शाहू महाराज आणि ताराबाई यांच्या सत्ता स्पर्धेचे आणि डावपेचांचे राजकारण चालू होते. चंद्रसेन जाधवांच्या बळावर ताराबाईच्या पक्षाला बळकटी मिळाली होती. इ. स. १७१० ते १७१४ या काळामध्ये ताराबाईनी अनेक प्रकारे आपल्या राज्यास अधिक स्थिर करण्याचा प्रयत्न केला. व या दृष्टीने शाहूराजांना जितका विरोध करणे शक्य आहे तितका विरोध केला.

याच काळामध्ये घडलेल्या काही घटनांनी ताराबाईचे सामर्थ्य कमी झाले. कारण १७१२ मध्ये ज्या सरदारांच्या मदतीने ताराबाईनी राज्य स्थिरावण्याचा प्रयत्न केला होता. तेच सरदार ताराबाईचा पक्ष सोडून गेले. चंद्रसेन जाधव इ. स. १७१३ मध्ये निजामाच्या पक्षात सामील झाले. यामध्ये दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, हैबतराव निंबाळकर इत्यादींचा समोवश होता. कोल्हापूर राज्याचा पहिला सेनापती म्हणून ताराबाईनी ज्याची नेमणूक केली होती तो कान्होजी आंग्रे हा देखील १७१३ मध्ये ताराबाईचा पक्ष सोडून गेला. ताराबाईचा स्वभाव महत्वकांक्षी व संशयी होता त्यामुळे अनेक सरदार दुखावले गेले. आपली बाजू सोडून जावू नये म्हणून बेलभंडारा उचलणे, दूधभाताची शपथ घ्यावयास लावणे यासारख्या गोष्टी त्या करावयास लावत. त्यामुळे या अत्यंत अस्थिर परिस्थितीमुळे ताराबाई व त्यांचे पुत्र शिवाजीराजे यांना राजसबाई च्या कैदेत राहावे लागले. राजसबाई यांचे पुत्र संभाजीराजे कोल्हापूर राज्याच्या गादीवर बसले आणि नवी राजवट सुरु झाली.

अशा काळात करवीर राज्याला धोका वाढत होता, कारण शाहूचा पक्ष बळकट बनला होता. त्याचप्रमाणे दक्षिणेत निजामाचे आसन ही स्थिरावत होते. अशा प्राप्त परिस्थितीमध्ये कोल्हापूरचा कारभार योग्य प्रकारे चालविणे हे रामचंद्रपंताना आवश्यक वाटत होते.

पन्हाळगडावर घडून आलेल्या या सत्तांतरामागे ताराबाईचे जूलमी वर्तनच कारणीभूत होते, हे संभाजीराजे सत्तेवर आल्यानंतर त्यांनी निजामाला पाठविलेल्या

पत्रांतून जाणवते. यामध्ये असे म्हटले आहे, "आपले जेष्ठ बंधू शिवाजीराजे यांचा जूलूम आणि प्रजेची दैना वाढतच गेली तेंव्हा शिवाजीचे हितचिंतक आणि राजमंडळातील प्रमुख लोक त्यांना सोडून गेले त्याचे कारण हे की त्यांच्या भोवती संधीसाधूचा आणि स्तुतिपाठकांचा गरडा पडल्यामुळे त्यांच्या हितचिंतकाचा त्यांच्या पर्यंत प्रवेश होऊ शकत नव्हता. या हितचिंतकात जसे मोठे मुत्सद्दी होते तसेच सेनाधिकारीही होते. प्रजा रक्षण हे माझ्या घराण्याचे प्रमुख ध्येय असल्याने काही विश्वासू मुत्सद्यांच्या अनुमतीने मी राज्यावर येण्यास तयार झालो. साप्रंत मी राज्यकारभारात सुव्यवस्था प्रस्थापित करण्यात गुंतलो असून त्यात मी बव्हंशी यशस्वी झालो आहे."[३]

असेच एक पत्र कोल्हापूरचे त्यावेळचे पारसनीस नीलप्रभूचे पुत्र 'बाबाजी प्रभू' यांनी ही 'पुरादिलखानास' लिहले होते. त्यात शिवाजीराजे यांचा छळ असहय झाल्याने राज्यातील लहान–मोठे अधिकारी त्यांच्यापासून दुरावले होते. असे लिहून बाबाजी प्रभू आपल्या नव्या स्वामीची प्रशंसा करुन म्हणतो, "आता संभाजीराजे गादीवर आल्याने त्यांनी त्यांना (अधिकाऱ्यांना) जवळ केले आहे. तरी तुम्ही त्याचे अभिनंदन करावे व तुमच्या विश्वासू नोकरांकरवी संभाजीराजे यांना नजराणा पाठवावा."[४]

वरील सर्व पत्रव्यवहारामध्ये 'शिवाजीराजे' असा उल्लेख असला तरी शिवाजीराजे अल्पवयीन असल्यामुळे कोल्हापूर राज्याच्या कारभाराची सर्व सुत्रे ताराबाईकडेच होती हे लक्षात घ्यावे लागते. यावरुन पन्हाळगडावर घडलेल्या या सत्तांतराच्या मागे ताराबाईचे जुलमी वर्तनच कारणीभूत होते.

## पन्हाळयावरील सत्तांतर कधी घडले असावे? :–

पन्हाळयावरील सत्तांतर नेमक्या कोणत्या दिवशी घडले यांचे संदर्भ मिळत नाहीत. पण सत्तांतराचे प्रत्यक्ष कार्य ऑगष्ट–सप्टेंबर १७१४ मध्ये घडले असावे. २ ऑगष्ट १७१४ चे शिवाजीराजे यांचे शेवटचे पत्र आणि २५ सप्टेंबर १७१४ चे संभाजीराजे यांचे पत्र अशी दोन पत्रे उपलब्ध आहेत. त्या ५३ दिवसांच्या काळात केव्हातरी प्रत्यक्ष सत्तांतर घडून आले.[५]

सत्तांतराच्या घटनेने पन्हाळयाच्या राजवाडयात किंवा राजवाडयाबाहेर ताराबाईना अनुकूल अशी काहीही प्रतिक्रिया घडली नाही. हे सत्तांतर घडून येणे आवश्यकच होते अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते.

रियासतकार सरदेसाई सत्तांतराच्या संदर्भात म्हणतात की, "ताराबाईच्या कठोरवृत्तीमुळेच तिला बंदिवास प्राप्त झाला असे दिसून येते. सहाय्यकास योग्य पाठबळ मिळाले नाही आणि शाहूचे उदार धोरण जगजाहीर होऊन गादीवरील लोकांचा प्रेमभाव उत्तरोत्तर ओसरत गेला."[६]

ताराबाईची सत्तांतराच्या संदर्भात प्रतिक्रिया पाहता ताराबाईनी सत्तांतराच्या घटनेनंतर पस्तीस वर्षांनी एका पत्रात असा उल्लेख केला आहे की, "काल परत्वे आमचा प्रसंग विस्कळीत होऊन संभाजीराजे व राजसबाई यांनी गिरजोजी यादव, अंताजी त्रिमळ व गडकरी तुरोजी शितोळे यांसी पुढे करुन किल्ले पन्हाळा येथे संभाजीराजे यांसी राज्यपदास बोलविले. आम्हास संकटी घातले. बहुत निकड केली." म्हणजेच या सत्तांतरात गिरजोजी यादव, अंताजी त्रिमळ व गडकरी तुरोजी शितोळे यांचा सहभाग होता. पण यांच्या बरोबर रामचंद्रपंत अमात्य यांचाही या सत्तांतरात सहभाग होता याचा उल्लेख गोव्याच्या व्हाईसरॉयने ११ डिसेंबर १७१४ रोजी रामचंद्रपंताना अभिनंदन पर पत्र पाठविले यात असा उल्लेख केला आहे. या पत्राच्या सुरुवातीस त्यांनी संभाजीराजे यांचे सरदार रामचंद्र पंडित अमात्य असा उल्लेख केला आहे. तसेच "मी आपणाला अभिनंदन पर पत्र लिहले आहे. त्याचवेळी मी नजराणा पाठविणार होतो. परंतु संशय होता म्हणून तो पाठविला नाही. आता संशय फिटला आहे...... जी राणी या प्रदेशावर राज्य करीत होती त्या राणीशी खरीखुरी मैत्री असून देखील मालवण (मेलुंदीच्या) किल्लेदाराचे आणि आमचे कधीच पटले नाही कारण त्याच्या कारकीर्दीत आमच्या प्रजाजंनाची नेहमीच लूटमार होत असे.[८] चालू राजवटीत या गोष्टी सुधारतील अशी आशा आहे.

ताराबाईचा स्वभाव संशयी असल्याने त्यांच्या पक्षाचे अनेक सरदार त्यांचा पक्ष सोडून गेले. पन्हाळगडावर घडून आलेल्या या सत्तांतरात रामचंद्र पंताची भूमिका ही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष फार महत्वाची होती.

अप्पासाहेब पवार यांच्या मतानुसार, 'बऱ्याच गोष्टी अशा सुचवितात की, रामचंद्रपंतानी या सत्तांतरात महत्वाची भूमिका बजावली. कारण, पुढील आलेल्या नव्या राजाचे ते कट्टर समर्थक होते.[९,१०] पन्हाळगडावर घडलेल्या या राजसत्तेच्या हस्तांतराला 'रक्तशून्य राज्यक्रांती' असे ही म्हटले जाते. हे सत्तांतर फार मोठे होते. कारण ताराबाईसारख्या महत्वकांक्षी व राजकारणी स्त्रीविरुध्द हे सत्तांतर घडवून आणणे इतके सोपे नव्हते. पण या घडून आलेल्या सत्तांतराने ताराबाई आणि शिवाजी महाराज यांना पन्हाळगडावर कैदेत रहावे लागले आणि राजसबाई व संभाजी महाराज यांना सत्तेवर येण्याची संधी प्राप्त झाली.

## संभाजी पहिलेः— (इ. स. १७१४ ते १७६०)

पन्हाळगडावरील सत्तांतरानंतर संभाजी महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले. संभाजी महाराजांनी अधिकार हाती घेतला तेंव्हा त्यांचे वय सुमारे सोळा वर्षाचे होते. त्यापैकी त्यांना बराच काळ ताराबाईच्या कैदेत काढावा लागला. त्यांना राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव नव्हता. त्यामुळे राज्यकारभाराचा सर्व भार रामचंद्रपंत अमात्य यांच्यावर होता, पण तो फार दिवस टिकला नाही. १९ नोव्हेंबर १७१५ ते १९ मार्च १७१६ दरम्यान रामचंद्रपंताचा मृत्यू झाला, त्यांची समाधी पन्हाळगडावर आहे.[११]

संभाजी महाराज पन्हाळगडाला असताना पन्हाळगडावर राजमंदिराचे काम त्यांनी 'नारोजी मुजाजी सुतार' याकडून करवून घेतले होते. व त्याबद्दल त्यास इनाम म्हणून तिन बिघे जमीन दिल्याचा उल्लेख या इनामपत्रात असा केला आहे. '........ किल्ले पनालियाचे मुक्कामी राजमंदिर व बंगला मुस्तेद केला. आणखीही कामे उत्तम केली .......... त्याजवरुन ......... स्वामी कृपालू होऊन ........ मौजे अवली त ॥ सातवे प्र ॥ मार या गावी वीसा पांडाचे बिधियाने बिघे ८३ तीन रास इनाम अजशम—हमत करुन दिली असे.' हे इनामपत्र १० जूलै १७७७ चे आहे.[१२]

सातारचे छ. शाहू व संभाजी दुसरे यांच्यात पन्हाळगडाच्या आसपासच्या प्रदेशात संघर्ष घडून येत होते. शाहू महाराजांनी संभाजी महाराजांच्या सरदारा विरुध्द मोहिमच उघडली होती. यात इ. स. १७१८ मध्ये शाहूराजांनी 'दमाजी थोरात' व

'यशवंत थोरात' या थोरात बंधूच्या विरुध्द मोहिम उघडली. दमाजी थोरात यास कैदेत टाकले. व वारणाकाठच्या थोराता विरुध्द दक्षिण भागात स्वारी काढली. वारणाकाठच्या थोरातामध्ये शिदोजी व त्याचा पुतण्या यशवंतराव हे पराक्रमी निघाले. यशवंतरावाने शाहूराजांकडे चाकरी पत्करली. शिदोजीने संभाजी महाराजांची बाजू सोडली नाही. पण शाहूराजांनी त्यांचे 'येळावीचे' ठाणे काबीज केल्याने त्यास आपल्या जमाव निशी पन्हाळयावर यावे लागले.

शाहू महाराज वारणा खोऱ्यातून मोहिम आटपून माघारी गेल्याने संभाजीच्या सरदारांनी यशवंतरावास कैद केली. पण यशवंतरावाने या कैदेतून आपली सुटका केली. शाहूंनी पाठविलेल्या सैन्यासह यशवंतरावाने संभाजीच्या वडगाव ठाण्यावर आक्रमण केले. या लढाईत संभाजीचा पराभव झाल्याने त्यांना पन्हाळगडावर परत यावे लागले. पण या लढाईतील 'तख्ताचा गजराज' न मिळाल्याने यशवंतराव संभाजीकडे परतला. पुढे सातारकर व करवीरकर यांच्यात संघर्षाला पुन्हा तोंड फुटले. बाळाजी विश्वनाथ यावेळी करवीरच्या मोहिमेवर होता. या झालेल्या लढाईत 'यशवंतराव थोरात' हा मारला गेला. व या ठिकाणीच त्याची पत्नी 'गोडाबाई' सती गेली. ही घटना पन्हाळयाच्या पायथ्याशी घडली. या घराण्यातील लोकांनी या ठिकाणी यशवंतराव थोरात व गोडाबाई यांचे संयुक्त मंदिर उभारले.[१३]

अशा प्रकारे हे लढाईचे प्रकरण पाच–सहा महिने चालू होते. दोन्ही पक्षाच्या फौजा आहे. वडगाव, येळावी पासून कोल्हापूर–पन्हाळा या भागात एकमेकांचा पाठलाग करीत होत्या.

पण इ. स. १७२८ मध्ये बाजीरावाने निजामाचा पालखेड या ठिकाणी पराभव केल्याने संभाजी महाराजांची एक प्रकारे पीछेहाट झाली होती. पालखेडच्या लढाईनंतर निजाम व बाजीराव पेशवे यांच्या दरम्यान झालेल्या तहातील एक कलम 'संभाजीस आपल्या हवाली करावे.' असे होते. पण निजामाने ते पाळले नाही. पण पालखेडच्या लढाईत निजामा बरोबर संभाजी होते का हा प्रश्न निर्माण होतो? पण प्रत्यक्ष लढाई संबंधीच्या माहितीत संभाजी महाराजांचा उल्लेख आढळत नाही. त्यावरुन ते पालखेडच्या लढाईच्या वेळी नसावेत असे अनुमान निघते. संभाजीराजे पालखेडच्या

लढाईच्या  पूर्वीच पन्हाळयाला आले होते. याचा उल्लेख २४ फेब्रुवारी १७२८ च्या पत्रात येतो. हे पत्र संभाजीराजेनी भगवंतराव अमात्य यांना पाठविलेले आहे. 'भगवंतराय अमात्य हुकूमतपन्हा यास आज्ञा ....... तुमचे वडीलांनी या राज्यात श्रम साहस करुन राज्य राखीले. त्यांचे पुत्र तुम्ही आहा. अशास स्वामी तीन वर्षे स्वारीस होते. प्रस्तूत आगमन, जाहले तुम्ही दर्शनास येऊन संतोषी करावे .......' [१४] संभाजीराजे जवळजवळ तीन वर्षे आपल्या राजधानी बाहेर होते. या उल्लेखावरुन संभाजीराजे मार्च १७२५ पासून   १७२८ च्या सुरुवातीपर्यंत पन्हाळयाबाहेर होते असे दिसते. या काळात कोल्हापूरचा राज्यकारभार त्यांच्या मातोश्री पाहत होत्या. इ. स. १७२६ आणि १७२८ या दोन वर्षातील काही कागदपत्रे राजसबाईच्या नावची आहेत.

पालखेड येथे निजामाचा पराभव झाला. व त्याला ६ मार्च १७२८ रोजी जो बाजीरावाशी तह करावा लागला. तो मुंगीशेगावचा तह म्हणून ओळखला जातो. एका दृष्टीने कोल्हापूरच्या संभाजीराजांचा हा पराभव होता.

## शाहू महाराज व संभाजीराजे यांच्यातील निर्णायक लढाई :—

पालखेडच्या लढाईनंतर शाहू महाराज व संभाजीराजे यांचा संघर्ष अधिक विकोपाला गेला. याच काळात उदाजी चव्हाण यांनी संभाजीराजांना शाहू महाराजांच्या विरुध्द लढाईत प्रोत्साहन दिले, व स्वतः पुढाकार घेतला. इ. स. १७२८ च्या दरम्यान शाहूंच्या प्रदेशावर उदाजी चव्हाण यांच्या स्वाऱ्या या सतत होतच राहिल्या. त्याचा शाहूंना उपद्रव होणे स्वाभाविक होते. इ. स. १७२९ मध्ये उदाजीने वारणेकाठचा प्रदेश लुटण्यास सुरुवात केली होती. तसेच शाहूच्यांवर एका मारेकऱ्यांचा हल्ला झाला होता. त्यामागे उदाजी चव्हाण व संभाजी महाराज यांचा हात असावा असा शाहूंचा संशय होता. शाहूंनी पुढच्या मोहिमेची तयारी सुरु केली. ऑक्टोंबर १७२९ पासून पुढील सहा महिने फेब्रुवारी १७३० पर्यंत मोहिमेची तयारी केली. ही मोहिम सातारा आणि कोल्हापूर या दोन राज्यांचे पुढचे संबंध निश्चित करण्याच्या दृष्टीने महत्वाची व निर्णायक स्वरुपाची ठरली. शाहूनी यावेळी पन्हाळा व कोल्हापूर यांचा सर्व टापू प्रत्यक्ष आपल्या ताब्यात घेण्याचे ठरविले होते. संभाजीराजांनी ही या लढाईची तयारी केली. या लढाईचे वर्णन असे केले आहे. "संभाजी महाराज (त्यांनी) मोगलाईत जाऊन खटपट

केली. तिकडून सिध्द जाहले नाही. देशी येऊन पन्हाळयास जाऊन उदाजीराव चव्हाण यांच्या हातून दंगा करवू लागले. म्हणून शाहू महाराज यांनी श्रीपतराव प्रतिनिधी व शंभूसिंग जाधव सेनापती यांस रवाना केले. उदाजीराव चव्हाण शिरोळे गुमट येथे होते. तेथे येऊन वेढा घातला. या संधीस संभाजीराजे कुटूंबसुध्दा श्रीनरसोबाच्या वाडीस जावयास निघाले होते. तेथेच उदाजी चव्हाण त्यांच्या कुमकेस गेले. (संभाजीने) शिरोळे येथील वेढा उठवून उदाजी चव्हाण पास ठाण्यातून (आपल्या) लष्करात आणले. नंतर दुसरे दिवशी पुन्हा लढाई झाली तेंव्हा त्यांचा मोड जाहला. चव्हाण सुध्दा निघून पन्हाळयास आले. जाधवराव व प्रतिनिधी यांची बुगणे लुटले...... राजसबाई व संभाजी महाराज यांचे कुटूंबसुध्दा पन्हाळयास रवाना केले. ताराबाई साहेब तुम्हापाशी राहते यांचा तह शके १६५२ (इ. स. १७३०) त झाला."[१५] म्हणजेच या लढाईत संभाजी महाराजांचा पराभव झाल्याने ते आणि त्यांचे कुटूंब पन्हाळयास परतले.

## वारणेचा तह :–

शाहूंनी संभाजीराजांचा वारणेकाठी पराभव तर केलाच. पण लगेच विशाळगड मिळवण्याची मोहिम आखली. त्यामागे कोल्हापूर राज्याची सर्व शक्ती खच्चीकरण करण्याचा हेतू असावा. संभाजीराजांचा यावेळी नुकताच पराभव झाला असल्याने त्यांना आपल्या फौजा एकत्र करता आल्या नाहीत. त्यात भगवंतराव पंत अमात्य व व्यंकटराव घोरपडे हे सातारकराच्या अटकेत होते. उदाजी चव्हाणवरचा संभाजीचा विश्वास डळमळीत झाला होता. अशावेळी संभाजीना वाटाघाटी करण्याशिवाय दुसरा काहीच मार्ग नव्हता. शाहूनीही यावेळी तह करण्याची इच्छा दर्शविली सात–आठ महिने वाटाघाटी होऊन पुढे दोघांच्यात जो तह झाला तो 'वारणेचा तह' म्हणून इतिहास प्रसिध्द आहे. पण या तहात दोन्ही राज्ये बरोबरीची आहेत असे मानूनच हा तह करण्यात आला. एक राज्य मुख्य आणि दुसऱ्याने त्यांचे मांडलिकत्व पत्करले होते असे काही या तहावरुन दिसत नाही. महाराणी ताराबाई इ. स. १७१४ पासून इ. स. १७३१ पर्यंत पन्हाळगडावर कैदेत होत्या. पण वारणेच्या तहानंतर त्या पन्हाळयास न राहता त्या सातारचे शाहू यांच्याकडे राहिल्या.

इ. स. १७४० मध्ये नानासाहेब पेशव्यांनी संभाजीराजांशी एक गुप्त करार केला होता. पण हा करार छ. शाहूला माहीत नव्हता. या करारात दूरदृष्टी होती. शाहू महाराजांना संतान नव्हते, व साताऱ्याचे राज्य ही संभाजीराजांना मिळावे, म्हणजेच या करारात कोल्हापूर व सातारा ही दोन राज्ये शाहूंच्या नंतर एक करावीत असा विचार चालविल्याचे दिसते. पण हा करार पुढे नानासाहेब पेशव्यांनी पाळला नाही. करारा नंतरची काही वर्षे करवीर छत्रपती आणि पेशवे यांचे संबंध सलोख्याचे राहिले. पण मध्यंतरीच्या काळात व्यंकटराव घोरपडे, सगुणाबाई शिंदे, दौलतराव शिंदे इत्यादी सरदार व संस्थानिकानी कोल्हापूर राज्याला उपद्रव देण्याचा उपक्रम चालूच ठेवला होता.

## पन्हाळयाची सरदेशमुखी :–

पन्हाळयाच्या प्रातांचा सरदेशमुखीचा भाग हा 'राणोजी घोरपडे' या सेनापतीकडे चालवावा अशा स्वरुपाचे पत्र संभाजी दुसरे यांनी 'कृष्णराव पंडित' यांच्याकडे ५ नोव्हेंबर १७४४ मध्ये पाठविले होते. या पत्रात असा उल्लेख केला आहे. '...... राजश्री कृष्णराव पंडित अमात्य यास आज्ञा केली यैसीजे सुभा प्रांत पन्हाळयाचे सरदेशमुखीचे वतनाचा हक्क इनाम पूर्ववत चालत आला असेल त्याप्रमाणे चालवावा याविसी हे पत्र सादर केले असे तरी तुम्ही आपणाकडील गावठाना ताकीद सरदेशमुखीचा अंमल जकात देखील पूर्ववत काये चालले आहे. त्याचप्रमाणे सेनापतीकडील कमाविसदाराकडे वसूल देत ते करणे .......' [१६]

इ. स. १७४८ नंतर साताऱ्याच्या गादीच्या भवितव्यासंबंधी प्रश्न निर्माण झाला होता. कारण, शाहूंच्या नंतर साताऱ्याच्या गादीला वारस नव्हता. या सत्ता संघर्षात ताराबाई आपला मुलगा रामराजा यास गादीवर आणण्यात यशस्वी झाली. स्वतः रामराजे यांनी भगवंतराव अमात्यांना दिलेल्या एका सनदेत स्वतःसंबंधी पुढीलप्रमाणे माहिती नमूद केली आहे. "पन्हाळयास तिर्थरुप नजरबंद असता आमचा जन्म झाला, ते काही वडिलांनी आम्हांस शिवरामपंत यांचे स्वाधीन केले...... हल्ली आबासाहेब यांनी सातारियाचे मुक्कामी अणून प्रकट करावयास तुम्हांस (भगवंतराय) अमात्यास शिराळयाहुन आणिले. हल्ली मातुश्री साहेबी बाळाजीपंत प्रधान व गोविंदराव चिटणीस

यास आज्ञा करुन आम्हास आणोन, सिंहासनारुढ करुन लग्न केले."[१७] म्हणजेच रामराजे यांचा जन्म शिवाजी महाराज पन्हाळगडावर नजरकैदेत असताना झाला. व ते पुढे ताराबाईच्या प्रयत्नाने सातान्यास सत्तेवर आले. पण ताराबाई व पेशवे यांच्या सत्ता स्पर्धेत ते असताना ही त्यांचा राज्यकारभारात प्रभाव पडला नाही.

## जिजाबाईकालीन पन्हाळा :–

इ. स. १७५०–५१ नंतर संभाजीराजे यांचे राज्यकारभारातून बरेचसे लक्ष कमी झाले असावे. कारण त्यानंतरच्या काळात छत्रपतींशी इतरांचा जो पत्रव्यवहार झाला आहे. त्यात जिजाबाईंना उद्देशून लिहलेली पुष्कळ पत्रे आहेत. पुढे संभाजीराजे २० डिसेंबर १७६० रोजी निधन पावले.

संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कोल्हापूर राज्याच्या वारसा बाबत प्रश्न निर्माण झाला. कारण संभाजी महाराजांना मुलगा नव्हता. त्यांच्या मृत्यूच्यावेळी त्यांची पत्नी कुसाबाई गरोदर होती, पण तिला मुलगी झाली. या काळात कोल्हापूर राज्याची सर्व जबाबदारी जिजाबाईवर पडली. पेशव्यांनी कोल्हापूरच्या गादीवर आपल्या प्रभावाखालील व्यक्ती दत्तक बसविण्याचा घाट घातला. या योजनेला जिजाबाईचा विरोध होता. तरीही पेशव्यांनी 'उमाजी भोसले' यांस फौजेसह पाठवून कोल्हापूरचे राज्य जप्त करण्याचे ठरविले.

संभाजीराजे समाप्त जाहल्याचे वर्तमान येथे आल्यावर 'श्रीमंत विसाजी नारायण' व 'सदाशिव अवधूत' यास जिजाबाईकडे रवाना केले. त्याचबरोबर 'महादजी भोसले मुंगीकर' यांचा धाकटा भाऊ उमाजी त्यास बरोबर घ्यावा आणि तेथे जाऊन त्यास राजा करावा. कारभार जिजाबाईंनी करावा पन्हाळा, रांगणा याप्रमाणे किल्ले द्यावेत. वरकड जो बंदोबस्त करणे तो सर्वत्रांनी करावा आणि ताराबाईप्रमाणे खाऊन खर्च नेमून द्यावा. त्याप्रमाणे जाऊन स्वास्थ राहावे. याप्रमाणे कबूल केल्यास उत्तम नाही तर जप्ती करावी ज्या किल्ल्यावर जिजाबाई असेल त्या किल्ल्याभोवती वेढा घालून बसावे"[१८]

पेशव्यांच्या या कृतीला जिजाबाईनी तीव्र विरोध केला होता. जिजाबाईनी यावेळी पेशव्यांच्या विरुध्द तयारी चालू केली होती, पण पुढे २३ जून १७६१ रोजी नानासाहेब पेशवे निधन पावले. या संधीचा फायदा घेऊन जिजाबाईनी आपण पसंत केलेला मुलगाच दत्तक घेतला. प्रमुख मंत्र्यांशी विचार विनिमय करुन शहाजीराजे खानवटकर यांचा मुलगा 'माणकोजी' यास दत्तक घेण्याचे ठरले. त्यानुसार माणकोजी यास पन्हाळयावर आणण्यात आले. त्यावेळी माणकोजीचे वय चार वर्षे होते.

नानासाहेबांच्या मृत्यूनंतर माधवराव पेशवे बनले. त्यांनी ही सुरुवातीस कोल्हापूर व सातारा ही राज्ये एक करण्याचे धोरण आखले होते. पण पानिपतावर झालेल्या नुकसानीमुळे मराठी राज्य थोडे दुर्बल बनले होते. अशा प्रसंगी आपपसात कोणताही तंटा नको यामुळे माधवरावांनी जिजाबाईशी नमते धोरण स्विकारले असावे.

जिजाबाईनी पन्हाळगडावर माणकोजीचा दत्तक विधानाचा समारंभ २२ सप्टेंबर १७६२ रोजी पार पाडला. त्यानंतर पाच दिवसांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर २७ सप्टेंबर १७६२ रोजी यथाविधी शिवाजी पन्हाळगडावर सिंहासनारुढ झाले. 'शहाजी भोसले' यांना पाच हजारांचा संरजाम देऊन जिजाबाईनी आपल्या पदरी ठेवून घेतले.[१९]

जिजाबाईनी निरनिराळया सरदारांकडून आपण कोल्हापूरच्या राजघराण्याशी एकनिष्ठ राहू अशी इनामपत्रे पन्हाळयावर लिहून घेतली. यात आबाजीराव कृष्ण प्रतिनिधी, हणमंतराव माणकेश्वर यांनी इनामपत्रे लिहून दिल्याचे संदर्भ मिळतात.[२०]

शिवाजी दुसरे अल्पवयीन असल्याने सर्व कारभार जिजाबाई (इ. स. १७६०– इ. स. १७७३) या पाहत होत्या. त्यांनी पेशवे, निजाम, हैदर, इचलकरंजीकर, सावंतवाडीकर व इंग्रज यांना यशस्वीरित्या तोंड देऊन करवीर राज्याचा पाया बळकट केला.

महाराणी जिजाबाईच्या काळात पन्हाळयावरील देवीला जिवंत मनुष्य बळी देण्याची प्रथा अस्तित्वात होती. या बाबत बा. प्र. मोडक त्यांच्या मतानुसार मनुष्य बळी देण्याची प्रथा या काळात मोठया प्रमाणात वाढली. बळी देण्यासाठी निराश्रीत माणसांना पकडून आणले जात असे. यासाठी वेगवेगळया टोळया या रात्ररात्र फिरत असत.

मनुष्य पकडून आणले जात असत. ज्या देवतेस हे बळी दिले जात त्या देवीचे मंदिर पन्हाळयावर आतल्या गढीत आहे. हे मंदिर दोन बुरुजांच्या मध्ये आहे. त्या मंदिराभोवती इतकी दाट झाडी आहे की मंदिरात सुर्यकिरण पोहचत नसत त्यामुळे याठिकाणी कायमस्वरुपी अंधार असे स्वाभाविकच ही जागा अत्यंत भयंकर होती. त्यामुळे ही जागा क्रुरकृत्यास योग्य होती असे म्हणतात.[२१] मोडकांनी आपले मत ग्रॅहमच्या रिपोर्टवर दिले आहे. याशिवाय पन्हाळयावरील नरबळी प्रथेविषयी कागदोपत्री संदर्भ मिळत नाही.

जिजाबाई काळात पन्हाळगडावर संभाजी महाराजाचे देवालय बांधले. त्याचा संदर्भ जिजाबाईना पाठविलेल्या एका पत्रात असा येतो. "आपत्य जोतिबा यादव चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना ......... साहेबाच कृपा दृष्टीकडून वर्तमान येथास्थित आसे....... तीन दरवाजे उघडून राबता चालविलीयाने गलादाणा वगैरे सर्व राबता चालेल आज्ञा करणार साहेब वडील समर्थ आहेत. सेवेशी विदित जाहले पाहिजे श्रृत होय हे विज्ञापना : रंगा गौड त्याचा.......॥ऊ व पाथुर्वट यैसे आज्ञा करुन पाठविलीयाने महाराजाचे देवालयाचे काम चालीस लागले पाथरवट डोंगर पावनगडचे यावे किला नि ॥ येथे आहेत. ........ [२२]

जिजाबाई १७ फेब्रुवारी १७७३ रोजी पन्हाळगडावर निधन पावल्या. कोल्हापूरचा इतिहास पाहता हे राज्य महाराणी ताराबाई यांनी स्थापन केले. तर महाराणी जिजाबाई यांनी त्याचे संरक्षण केले असे म्हणता येते.

माधवराव पेशवे यांनी त्यांच्या काळात कोल्हापूरच्या गादीशी जे करार केले होते. त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होवू शकली नव्हती. विशेषतः पटवर्धन आणि इचलकरंजीचे घोरपडे.[२३] यांचे कोल्हापूरच्या प्रदेशावर सतत आक्रमण होत असे. पण करवीरांचे पूर्ण पारिपत्य करण्यास पटवर्धन बंधूना पाच–सहा वर्षे प्रयत्न करुनही अपयश आले होते. तसेच त्यांच्या जोडीला असणारे रामचंद्र गणेश परांजपे व कृष्णराव यांचे ही प्रयत्न निष्फळ ठरले. म्हणून महादजी शिंदे यांना करवीरच्या मोहिमेवर पाठविण्याचा निर्णय झाला.

## महादजी शिंदेची कोल्हापूरावरील स्वारी :–

पेशवा माधवरावाच्या मृत्यूनंतर (इ.स. १७७२) सर्व राज्यकारभार कारभाऱ्यांनी हाती घेतला होता. व कारभाऱ्यांनी महादजी शिंदेची करवीर मोहिमेवर इ.स. १७७७ च्या नोव्हेंबर मध्ये रवानगी केली. महादजी रहिमतपुर, मसूर, कराड, टोप मार्गे वारणेला आला तेथून पन्हाळयास वेढा घालण्याची तयारी करुन तो वडगावास गेला, तेथून करवीरकरांची बरीच ठाणी त्याने घेतली.[२४]

महादजीने नंतर करवीरास वेढा देऊन तीन महिन्यांपर्यंत कोल्हापूर शहर जिंकण्याचा प्रयत्न चालविल्याचे दिसते. पण शहरातील दारुगोळा व इतर साहित्य भरपूर असल्याने त्याला यश येऊ शकले नाही. करवीरकरांच्या बाजूने येसाजी शिंदेने पन्हाळा व कोल्हापूर यांची मजबूती करुन महादजीशी समेटाचे बोलणे सुरु केले. येसाजीस हैदरअलीने मदत देण्याचे मान्य केले होते. पण मदत वेळेत पोहचू शकली नाही. येसाजीने लाख ते दोन लाखात हे प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला होता. पण महादजीने खंडणी रुपाने तीस लाखाची मागणी केली होती.

महादजीच्या फौजा राजधानी पन्हाळयाजवळ आल्या होत्या. कोल्हापूर शहरावर ही महादजीच्या फौजेचे दडपण वाढले होते. याकाळात महादजीने पंचवीस हजार फौजेनिशी करवीरवर चाल केली. करवीरकर सरदारांनी लढाईस कौशल्याने तोंड दिल्याचे दिसते. याकाळात छत्रपतींचा मुक्काम पन्हाळयास होता. करवीर सरदारांच्या प्रयत्नाने या मोहिमेत करवीरकरांना काहीसे यश मिळाल्याचे दिसते. मात्र जेंव्हा पन्हाळयास वेढा पडला तेंव्हा करवीरकरांनी तीन लक्ष देण्याचे मान्य केले. पण कारभाऱ्यांनी पाच लक्ष व चिकोडी–मनोळी यांची मागणी केली. हे करवीरकरांनी मान्य न केल्याने महादजीने पुण्याहून 'महाकाली' तोफ पाठवावी असे कळविले. तसेच करवीरकरांच्या राजधानीस एक महिना मोर्चेबंदी करण्यात आली. एका बाजूने बोलणी व दुसऱ्या बाजूने प्रतिपक्षावर हल्ले या धोरणांमुळे हा संघर्ष लवकर मिटू शकला नाही.[२५]

महादजीने दक्षिण भागातून अनेक तोफा आणल्या होत्या. तसेच पन्हाळयाचा ताबा मिळवण्याचा त्यांनी निश्चय केला होता. शेवटी परिस्थिती हाताबाहेर गेल्याने येसाजीने महादजीच्या अटी मान्य केल्या. व २३ एप्रिल १७७८ मध्ये हा तह घडून आला. या तहाने करवीर राज्याच्या सीमा ठरल्या गेल्या. व त्याचबरोबर दहालक्ष रुपये देण्याचा करार ही करण्यात आला होता. पण पुढे हा करार पाळला गेला नाही.[२६]

महाराज दुसरे शिवाजीराजे यांच्या मातोश्री श्री दुर्गा आईसाहेब या इ. स. १७७९ मध्ये पन्हाळगडावर निधन पावल्या. त्यांच्या मृत्यूनंतर शिवाजी दुसरे स्वतः कारभार पाहू लागले. त्यांना यशवंतराव शिंदे यांनी बरीच मदत केली.

## यशवंतराव शिंदेना पन्हाळयावर मारण्याचा कट :–

यशवंतराव शिंदे सेनासाहेब सुभेदार हे जिजाबाईच्या माहेराकडील म्हणजे तोरगलकर शिंदे यांच्या घराण्यातील होते. अत्यंत विश्वासू, धोरणी व कर्तबगार असल्याने त्यांनी जिजाबाईच्या काळात महत्वाच्या कामगिरी पार पाडल्या. यशवंतराव शिंदे यांचे राज्यकारभारात वजन वाढत गेले. त्यामुळे सुभेदार व अमात्य यांचे राज्यकारभारात महत्व कमी झाले. म्हणूनच शिंदेना मारण्याचा कट शिजला असावा. या कारस्थानाची मुख्य सुत्रे 'सिताराम यादव हवालदार' याकडे होती. 'आबाजी कृष्ण पंडित' प्रतिनिधी व 'सुबराव कृष्ण पंडित' अमात्य हे ही या कटात सामील झाले. यशवंतराव शिंदे पन्हाळयावर नित्यनियमाप्रमाणे अंबाबाईचे दर्शन घेऊन महाराजांच्या दर्शनास जात असताना त्यांच्यावर मारेकरी पाठविल्याचा त्यांना अंदाज आला. त्यामुळे यशवंतरावाना ठार मारण्याचा कट फसला. पकडलेल्या मारेकऱ्यांकडून या कटात सामील असणाऱ्यांची नावे मिळवली. नेर्लीकर व यादव हवालदार यांची चौकशी करुन त्यांना शिक्षा करण्यात आल्या. पंडित अमात्य व पंडित प्रतिनिधी यांचा ही या कटात सहभाग असल्याने त्याच्याकडून योग्य वर्तणूकीची इनामपत्रे लिहून घेण्यात आली.[२७]

पुढे इ. स. १७८३ मध्ये यशवंतराव शिंदे यांचा मृत्यू झाला. त्यामुळे रत्नाकर अप्पा यांच्याकडे प्रधानकीची वस्त्रे देण्यात आली. सुरुवातीस ते पन्हाळयास सरकारी नोकरीत होते.

## राजधानी पन्हाळा ते करवीर :–

इ. स. १७१० मध्ये महाराणी ताराबाईनी करवीर गादीची स्थापना केली. व त्याची राजधानी पन्हाळगडाला निर्माण केली. त्यामुळे नंतरच्या काळात पन्हाळगडाचे महत्व अधिक वाढले. यानंतर कोल्हापूर राज्याची सर्व प्रशासन व्यवस्था पन्हाळयावरुन पाहिली जात असे. पानिपतच्या लढाई नंतर कोल्हापूर, सातारा, पुणे, हैदराबाद या राजधान्यांना राजकिय दृष्टया महत्व प्राप्त झाले. यानंतर करवीर छत्रपती दुसरे शिवाजी यांच्या काळात राजधानी पन्हाळयावरुन कोल्हापूरात आणली. या पाठीमागे कोणते कारण कारणीभूत झाले असावे, या संदर्भात बा. प्र. मोडक असे मत व्यक्त करतात की, शके १७१० (इ. स.१७८८) मध्ये रत्नाकरपंत राजाज्ञा याचा मुलगा नारायणराव हा वारवा होऊन आजारी होता. त्यासाठी रत्नाकरपंत पन्हाळयाहून निघाले. पण वाटेवर असताना मोठया प्रमाणात पाऊस झाल्याने ते वडणगे जवळ घोडयावरुन पडले. त्यांना इजा झाली ही घटना महाराजांना समजली ते ही करवीरी आले. काही दिवस उपचार घेतल्यावर राजाज्ञा ठिक झाले. तसेच महाराजांच्या कामगारांना ही सतत करवीरी यावे लागते. व गडावर राहण्यास सर्वांना अडचण भासत होती. या कारणांमुळे पन्हाळयाची राजधानी कोल्हापूरात इ. स. १७८८–८९ या दरम्यान आणण्यात आली.[२८] या संदर्भात स. मा. गर्गे यांनी ही मोडकांचेच मत व्यक्त केले आहे.[२९]

तर डॉ. कमलाकर यांच्या मतानुसार, छत्रपती दुसरे शिवाजी इ. स. १७७९ मध्ये प्रत्यक्ष राज्यकारभार करु लागल्यानंतर पेशव्यांच्या कर्नाटकातील हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी तसेच पेशव्यांचा सरहद्दीवर उपद्रव वाढला असल्याने प्रत्येक वेळी कारभाऱ्यांना कागदावर शिक्का आणण्यास पन्हाळयाला जावे लागे, ते अतिशय कठीण होत असल्यामुळे छत्रपतीनी राजधानी पन्हाळगडावरुन पायथ्याशी म्हणजे कोल्हापूरास आणली.[३०]

एकंदरीत संदर्भावरुन करवीर छत्रपती दुसरे शिवाजी यांनी पन्हाळगडाची राजधानी इ. स. १७८८–८९ मध्ये कोल्हापूरास आणली. कारण कामगारांना प्रत्येक वेळी करवीरी येणे जाणे त्रासाचे होते. तसेच या प्रदेशात पावसाचे प्रमाण जास्त

असल्याने रस्त्याला चिखल जास्त होई, त्यामुळे वाहतुकीस अडचण भासे. या कारणांमुळे राजधानी पन्हाळयाहून कोल्हापूरात आणण्यात आली. पण तरीही पन्हाळगडाचे महत्व कमी झाले नाही. कारण कोल्हापूरावर शत्रूचे आक्रमण झाल्यास कोल्हापूराहून पन्हाळयास जाणे सोप होते. कारण इतर गडाच्या तुलनेने कोल्हापूर पासून पन्हाळगड जवळ होता. त्याचप्रमाणे पन्हाळगड संरक्षणाच्या दृष्टीने अभेद्य होता. शत्रूला सहजा–सहजी हा किल्ला मिळवणे शक्य नव्हते. तसेच पुढील काळात पन्हाळगडाचा वापर हिल स्टेशन म्हणून करण्यात येऊ लागला.

## रामचंद्र पटवर्धनांची कोल्हापूरावर स्वारी :–

पट्टणकुडीच्या लढाईत (इ. स.१७९९) परशुरामभाऊ यांचा मृत्यू झाला. भाऊच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी म्हणून रामचंद्र पटवर्धनांनी करवीरकरांच्या विरुध्द मोहिम काढली. याची पूर्व कल्पना शिवाजीराजे दुसरे यांना असावी, म्हणून त्यांनी करवीर व पन्हाळा या प्रदेशांची संरक्षण व्यवस्था वाढवली. करवीरकरांच्या बाजूने चतुरसिंग, हिंमत बहादूर आणि पाटणकर सरलष्कर यांनी ही तयारी केली.

करवीरकर व पटवर्धन सैन्यांच्या चकमकी घडू लागल्या. पटवर्धनांना इंग्रजानी मदत केल्याने त्यांची बाजू मजबूत होती. कोल्हापूरच्या राज्यावर सर्व बाजूने आक्रमण होत होते. शेवटी शिवाजी महाराजांनी राजज्ञाशी चर्चा करुन महाराजांनी पन्हाळगडास जाण्याचा निर्णय घेतला. शहराच्या संरक्षणाची जबाबदारी राजाज्ञा आणि प्रीतीराव चव्हाण हिंमत बहादूर यांच्यावर सोपविण्यात आली. महाराज ७ फेब्रुवारी १८०० रोजी पन्हाळगडावर जाण्यास निघाले. त्यांच्यासह बळवंतराव पंतप्रतिनिधी, चतुरसिंग भोसले, हैबतराव गायकवाड, विश्वासराव गायकवाड, रायजी जाधव, दौलतराव गायकवाड इत्यादी सरदार होते. महाराज पन्हाळयास जात असल्याची बातमी रामचंद्र पटवर्धनांना मिळाल्याने, ते सैन्यासह महाराजांच्या पाठलागार्थ पन्हाळयाच्या रेडे घाटाजवळ आले असता, दोन्ही पक्षांच्या गाठी पडल्या व या ठिकाणी झालेल्या संघर्षात हैबतरावास जास्त दुखापत झाल्याने त्यांना पन्हाळगडावर नेण्यात आले, पण तेथे त्यांचा मृत्यू झाला. विश्वासराव गायकवाड हा या संघर्षात मारला गेला. त्याचा मृतदेह ही पन्हाळयावर नेण्यात आला. व तेथेच दोघांचा अंत्यविधी एकत्र केला.

१ मार्च १८०० ते १३ मार्च १८०० पर्यंत करवीराच्या कोटाभोवती मोठे युध्द झाले. व या युध्दात पटवर्धनांच्या सैन्याला माघार घ्यावी लागली.

कोल्हापूरच्या बाजूने या मोहिमेची सर्व सुत्रे 'रत्नाकर राजाज्ञा' यांच्याकडे होती. प्रथम हिंमत बहादूर यासही त्यांच्या मदतीला नेमलेले होते. पण आठ–पंधरा दिवसात हिंमत बहादूर ही पन्हाळयास परतले. आणि शहराच्या बचावाची मोहिम एकटया राजाज्ञावर पडली. अशा परिस्थितीत इंग्रजानी ही करवीरकरांना मदत देण्याचे टाळले होते. करवीरकरांनी यावेळी पराक्रमाची शर्थ केली होती, तरी ही पटवर्धनांनी महाकाली देवालय, वरुणतीर्थ वेश पन्हाळयाच्या बाजूस उत्तरेश्वर, जितिचा ओठा, पंचगंगेचा उत्तरतीर, रंकाळा इत्यादी ठिकाणाहून कोल्हापूरच्या किल्ल्यावर हल्ले केले होते. दरम्यानच्या काळात पुण्यात नाना फडणीसांचा १३ मार्च १८०० रोजी मृत्यू झाला. यावेळी दौलतराव शिंदे यांचे पुणे दरबारात स्थान वाढले होते. त्यांनी बाजीराव पेशवे यांच्याशी बोलणी करुन कोल्हापूरचा वेढा उठविण्यात आला. त्यामुळे कोल्हापूरवरील संकट टळले. वेढा उठविल्याची बातमी राजज्ञांनी शिवाजीराजे यांना पन्हाळगडावर कळविली. नंतर शिवाजीराजे आपल्या परिवारासह व बाबामहाराज यांच्या कुटुंबियांसह पन्हाळयाहून कोल्हापूरला आले.[३१] अशा प्रकारे राजधानी कोल्हापूरवर शत्रू पक्षाचे आक्रमण झाल्यास कोल्हापूर पासून जवळ असणारा व संरक्षणाच्या दृष्टीने अभेद्य असणाऱ्या पन्हाळगडाचा वापर स्वसंरक्षणार्थ संकट काळात केला जात असे.

शिवाजी दुसरे यांनी राज्य कारभारात किल्ल्यांच्या बांधणीने बळकटी आणली. प्रत्येक सुभ्याचे मुख्य ठिकाण एखादा किल्ला किंवा कोट असे. त्याकाळात पन्हाळगडासारखा किल्ला ताब्यात असणे म्हणजे, सभोवतालच्या शंभर मैलाचा प्रदेश ताब्यात असणे असा अर्थ होता. किल्ला हातून गेल्यास भोवतालचा प्रदेश ही शत्रूच्या ताब्यात जाई. त्यामुळे राज्यकारभार करणे अशक्य होई. करवीर राज्यात ही किल्ला म्हणजे कारभाराची केंद्रस्थाने होती. करवीर राज्यातील प्रमुख किल्ल्यांची व्यवस्था पाहणारे वेगवेगळे अधिकारी असत. येथे हवालदार, सुभेदार, गुरखे, कारखानीस किल्लेदार हे काम पाहत. किल्ल्याच्या लष्करी व्यवस्थेसाठी अश्वरुढ, बारगीर, पेठकरी व वाजेलोक असत. किल्ल्यावर लोकवस्ती सर्वसाधारणपणे दोन ते पाच हजार पर्यंत

असे. व किल्ल्यांच्या आसपास विरळ वस्ती असे.[३२] थोडया फार फरकाने अशाच प्रकारची व्यवस्था पन्हाळगडावर असावी.

इ. स. १८११ मध्ये सिधोजीरावांनी कोल्हापूरावर मोहिम काढली. या मोहिमेत त्यांनी करवीरच्या फौजेचा पराभव केला. मोहिम अधिक आक्रमक बनवली. यावेळी इंग्रजानी करवीरच्या राजकारणात प्रवेश करण्याची संधी मिळवली. या काळात सिंधुदुर्ग ठाणे मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. यासाठी त्यांनी करवीरकरांशी सिधोजीरावांच्या बंदोबस्ताच्या बदल्यात सिंधुदुर्ग ठाणे देण्याचा करवीरकरांशी तह केला. (१ ऑक्टोबर १८१२) यानंतर सहा महिन्यांनी २४ एप्रिल १८१३ रोजी दुसरे शिवाजी यांचा मृत्यू झाला.

## संभाजी दुसरे :– (इ. स.१८१२–१८२१)

इ. स. १८१२ च्या करारामुळे करवीर सत्तेला अनेक मर्यादा पडत गेल्या. शिवाजीराजांच्या मृत्युनंतर त्यांचे जेष्ठ पूत्र शंभूराजे उर्फ आबासाहेब महाराज गादीवर आले.

### पन्हाळा टंकसाळ :–

करवीरचे संभाजीराजे दुसरे यांनी इ. स. १८१५ मध्ये पन्हाळा येथे टंकसाळ सुरु केली. पन्हाळा येथे जो रुपया पाडण्यात आला. त्यावर शंभूराजांचा शिक्का पाडला त्या संदर्भात आज्ञापत्रात असा उल्लेख येतो, “किल्ले पन्हाळा येथे शंभू शिका रुपयाची टांगसाळ पन्हाळी चालविली आहे. तरी गावगन्ना वगैरे कडील वसुल घेणे तो शंभु शिका पनाळी घेऊन शिबंदी वगैरे खर्च करीत जावा. म्हणोन आज्ञापत्री आज्ञा जाहली ...... तरी किल्ले पनाळा येथील मासले प्रमाणे खुऱ्यास वारा गुंजांची आयास घालून रुपया पाडवा. आपण विनंती लिहले अन्वये सराफ व सावकार व उदमी यासी पत्रे सादर जाहली आहे. पाठवून देऊन टंगसालेची आमदरपत्री महापुरी करावी. मलकापुरी रुपयेचा शिक्का पेशजीचे आज्ञावरुन बंड करुन सिके ठेवले म्हणोन विनंती पत्रे लिहले.......”[३३]

एम. जी. रानडे यांच्या मतानुसार करवीर संभाजी पहिले यांच्या काळात पन्हाळगडावर राजधानी असताना इ. स. १७५९ मध्ये पन्हाळा येथे टंकसाळ सुरु होती. व तिथे पाडला जाणारा रुपया हा 'पन्हाळी' किंवा 'सुभा' रुपया या नावाने ओळखला जात होता. त्यांचे वजन १७०.६ ग्रॅम इतके होते. इ. स. १७५९ ते १७८८ पर्यंत म्हणजे राजधानी पन्हाळयावर असेपर्यंत हा पन्हाळा रुपया पाडला जात असे. त्यानंतर पन्हाळा येथील टंकसाळ कोल्हापूरात आणली होती.[३४] पण आबासाहेबांनी इ. स. १८१५ मध्ये पन्हाळयावर पुन्हा टंकसाळ सुरु केली.

करवीर सरकारची वेगवेगळया प्रकारची नाणी होती. यात ३६ प्रकारचे रुपये, दुथांडी, पन्हाळी, काळे व कंपनी वगैरे चार प्रकारचे पैसे अशा नाणी चालत असत. यात मुख्य पन्हाळी व हुकेरी ही नाणी होती. सरकार जमाबंदीत पन्हाळी रुपये घेत आणि पन्हाळीच रुपये नोकर लोकास देत.[३५] म्हणजे पन्हाळी रुपये व नाण्यांना महत्व असल्याचे दिसते.

इ. स. १८१८ मध्ये पेशव्यांच्या सत्तेचा शेवट झाला. पर्यायाने मराठयांच्या सत्तेचा शेवट झाला. व ब्रिटीश सत्तेचे सामर्थ्य आणखी वाढले.

इ. स. १८२१ मध्ये संभाजीराजे उर्फ आबासाहेब महाराज यांच्या आयुष्याचा शेवट अनपेक्षीत झाला. राजवाडयात त्यांचा 'सयाजी मोहिते' नावाच्या व्यक्तीने खून केला. [३६]

## शहाजी उर्फ बुवासाहेब :– (इ. स.१८२१–१८३८)

संभाजी दुसरे यांच्या मृत्यूनंतर शहाजी उर्फ बुवासाहेब हे गादीवर आले. इ. स. १८२५ मध्ये कित्तूर येथे जे बंड झाले. त्या बंडवाल्याना बुवासाहेबांचे सहाय्य असावे, अशी इंग्रजाची धारणा झाली. तसेच बुवासाहेबांनी कागलचे ठाणे ताब्यात घेऊन तालुक्यावर आपला अंमल बसविला. तेंव्हा करवीर राज्यावर ताबा ठेवण्यासाठी कागलच्या दौलतराव शिंदेचे प्रकरण पुढे करुन बेवरने डिसेंबर १८२५ मध्ये कोल्हापूर राज्याला वेढा दिला. महाराजांनीही फौज जमा केली होती. दोन्ही पक्षांचा संघर्ष घडून

आला, यात बुवासाहेबांना माघार घ्यावी लागली. व यातून इ. स. १८२६ मध्ये तह करणे भाग पडले. या तहाने छत्रपतींच्या सत्तेला खूपच मर्यादा पडल्या.

**पन्हाळगडावर इंग्रजांची फौज :—**

इंग्रजांना पुढे कोल्हापूर राज्यात व पन्हाळगडावर फौज ठेवण्याची संधी मिळाली या मागे एक घटना कारणीभूत झाली. दक्षिणेकडील एक वैष्णवीस्वामी जगदंबेच्या दर्शनासाठी कोल्हापूरला आले होते. त्यांच्याकडे हत्तीचे एक पिल्लू होते. बुवासाहेबांना ते पिल्लू हवे होते, पण स्वामीनी देण्यास नकार दिला. त्यामुळे बुवासाहेबांनी त्यांना शहराबाहेर जाऊ दिले नाही. स्वामीनी अखबार नवीसाकडे शहराबाहेर पोहचविण्याची विनंती केली. अखबार नवीसानी स्वामींना शहराबाहेर पोहचविण्याची व्यवस्था केली. पण त्यांना ही अडचणींना सामोरे जावे लागले. त्यामुळे ही सर्व माहिती त्यांना धारवाडच्या इंग्रज सरकलेक्टराकडे कळविली. महाराजांनी अखबार नवीसाचे समाधान करण्याचा प्रयत्न केला होता. पण धारवाड सरकलेक्टर आणि पोलिटिकल एजंट निसबट हे फौजेसह कोल्हापूरला आले. बुवासाहेबांनी इंग्रजांच्या म्हणण्यानुसार चालण्याची तयारी दर्शवली. तसेच इंग्रजांनी बुवासाहेबांना कळविले की, कोल्हापूर पन्हाळा, पावनगड इत्यादी किल्ल्यांच्या सोडचिठ्ठया देण्यात याव्यात तसेच नवीन फौज ठेवून घेतली असल्यास ती घालवून द्यावी. याप्रमाणे बुवासाहेबांनी इंग्रजांना सोडचिठ्ठया दिल्या.[३७]

व यानंतर, १५ मार्च १८२९ रोजी इंग्रज आणि कोल्हापूर यांच्या दरम्यान नवा तहनामा झाला. या तहनाम्याने छत्रपतीचे लष्करी सामर्थ्य आणि मुलकी कारभारातील सत्ता या दोन क्षेत्रांची सूत्रे इंग्रजाच्या हाती गेली. तसेच या करारान्वये कंपनी सरकारची फौज आवश्यक वाटेल तितके दिवस करवीरच्या किल्ल्यात व पन्हाळगडावर ठेवण्यास मान्यता देण्यात आली. या फौजेचा सर्व खर्च छत्रपतीनी कंपनी सरकारला देण्याचे मान्य केले. कोल्हापूर व पन्हाळा येथे इंग्रजांची फौज ठेवण्याचे ठरले. आणि त्याप्रमाणे राज्याच्या या दोन महत्वाच्या ठिकाणी इंग्रजांचा लष्करी ताबा राहिला. ही फौज नंतर काढून घेण्यात आली.[३८]

तहनाम्यातील आणखी एका कलमानुसार, कोल्हापूरच्या कारभारासाठी इंग्रज आपला अधिकारी नेमतील. यानुसार 'नारायणराव पंडित राजाज्ञा' यांना राज्याचे नवे कारभारी नेमण्यात आले. एकीकडे इंग्रजांची फौज आणि दुसरीकडे इंग्रजांनी नेमलेला कारभारी अशा दोन्ही बाजूंनी छत्रपतींची सत्ता मर्यादित झाली. यानंतर पुढे कारभारीचे पद 'रामराव देसाई' हे आपल्या ताब्यात घेण्यात यशस्वी झाले.

इ. स. १८३८ मध्ये बुवासाहेब पंढरपुराहून विठोबाचे दर्शन घेऊन तुळजापुरला जात असताना यवतीच्या मुक्कामी त्यांची प्रकृती अधिक बिघडली आणि शेवटी २९ नोव्हेंबर १८३८ रोजी ते निधन पावले.

### शिवाजी उर्फ बाबासाहेब :– (इ. स.१८३८–१८६६)

बुवासाहेब महाराजानंतर त्यांचा जेष्ठ पुत्र शिवाजी उर्फ बाबासाहेब कोल्हापूरच्या गादीवर आले. या काळात बुवासाहेब यांच्या थोरल्या भावजय सईबाई उर्फ दिवाणसाहेब व ताराबाई यांच्यात राज्यव्यवस्थे संबंधी स्पर्धा सुरु होती. या काळात रामराव देसाई राज्यकारभार पाहत होते. त्यांनी यातून पर्यायी मार्ग काढला. दिवाणसाहेब यांच्यातर्फे दिनकरराव गायकवाड व रावजी वाकनिस यांनी कारभार पाहावा. आणि बाबासाहेब महाराज यांच्या मातोश्री ताराबाई यांच्या वतीने जीवराव जाधव आणि मोरोपंत हुजूर यांनी कारभार पाहवा. असे एकूण चार कारभारी नेमण्यात आले. पण ही राज्यकारभाराची व्यवस्था फार दिवस टिकू शकली नाही. ताराबाई आणि दिवाणसाहेब यांचा अंतर्गत संघर्ष सुरुच राहिला. यामुळे कोल्हापूर राज्याची प्रशासनव्यवस्था योग्य प्रकारे चालू शकली नाही.

### इ. स. १८४४ च्या उठावाची पार्श्वभूमी :–

सर्व व्यवस्थेवर पहिला उपाय म्हणून वाकनीस यांना राज्यकारभारातून काढून टाकण्यात यावे. आणि त्यांच्या जागी एखाद्या इंग्रज अधिकाऱ्यांची नेमणूक करावी असे ठरविण्यात आले होते. पण इतर कारभाऱ्यांना हे मान्य होणार नाही हे पाहून, त्यानी दिवाणसाहेबांना कारभार मंडळाचे मुख्य नेमावे, आणि त्यांच्याच पक्षाचे दिनकरराव गायकवाड व मोरोपंत हुजूरबाजार मदतनीस म्हणून नेमावे अशी मुंबईच्या गव्हर्नरकडे

शिफारस केली. त्याला अनुसरुन काही नव्या प्रथा चालू करण्यासंबंधी रिव्हीजने सुचविले. त्याला मंजूरी मिळाली यात—कारभारांच्या खर्चासंबंधी काही निश्चित बाबी ठरल्या. कोल्हापूरचा जमाखर्च पोलिटिकल एजंटच्या सुचनेप्रमाणे व्हावे असे कारभाऱ्यांना मान्य करावयास लावले. तसेच कारभार मंडळावर देखरेखीसाठी आपला एक अधिकारी नेमण्यात यावा असे कलम घातले. पण इंग्रज अधिकाऱ्यांनी घालून दिलेल्या प्रथा आणि केलेली व्यवस्था सात—आठ महिन्यांपेक्षा अधिक काळ चालू शकली नाही.

इंग्रजांनी राज्यकारभारावर अधिक वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. पण निरनिराळया वर्गातून ब्रिटीश सत्तेविरोधात प्रक्षोभ वाढत गेला. तरीही टाउनशेंडने इ. स. १८४४ पर्यंत कोल्हापूरचा मुख्य कारभारी कोल्हापूरच्या एखाद्या प्रतिष्ठित घराण्यातील ठेवला होता. पण ही प्रथा बदलून त्याने इंग्रज सरकारचा अधिकारी कोल्हापूरचा मुख्य कारभारी नेमण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कोल्हापूरचे पहिले कारभारी म्हणून श्री. दाजी कृष्ण पंडित यांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी नव्या शासकीय सुधारणा अंमलात आणल्या, त्या पूर्वी पेक्षा वेगळया स्वरुपाच्या होत्या. यातील काही सुधारणा या चांगल्या ही होत्या. पण यातून कोल्हापूरच्या प्रजेच्या स्वाभिमानावर आघात होत होते.

### इ. स. १८४४ चे बंड :—

संरजामदाराना आणि वतनदारांना नव्या परिवर्तनाच्या काळात वरचेवर निर्बंध मान्य करण्याखेरीज काही ही मिळणार नव्हते. सर्वसामान्य प्रजेलाही आपली राजनिष्ठा आणि त्या बरोबर स्वाभिमान इंग्रजाकडून हिरावून घेतला जात आहे. याचीच जाणीव झाली होती. यातूनच काही महिन्यांतच कोल्हापूर राज्यात जागोजागी सार्वत्रिक उठाव होत गेले. अशात दाजी कृष्ण पंडित यांनी महसूल, जमाबंदी, शिबंदी, किल्ल्यांचा कारभार, पैशांचा व्यवहार इत्यादी क्षेत्रात करडा अंमल सुरु केला. त्यामुळे कारभाऱ्याविरुध्द म्हणजेच ब्रिटीशांच्या धोरणा विरोधी उठाव होऊ लागले. त्याचा परिणाम म्हणून कारभाऱ्यांना कैदेत ठेवण्यात आले. वस्तुतः लोकांनी केलेला हा उठाव

खुपच मोठा होता. हे बंड भुदरगड, सामानगड, पन्हाळगड कोल्हापूर शहर इत्यादी भागात मोठा प्रमाणात उठाव घडून आला.

इंग्रजी सत्तेविरुध्द लोकांच्या भावना त्यावेळी किती प्रक्षुब्ध झाल्या होत्या. याचे वर्णन 'मेजर मालकम' याने मेजर ग्रॅहमला सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे. "लष्कराचे साहाय्य घेऊन बंडाचा बिमोड करण्यापूर्वी ते इतके उग्र स्वरुपाचे बनले होते की, कोल्हापूर राज्याशी संबंधीत असलेला एक ही मनुष्य त्या बंडापासून बाजूला राहिला नव्हता. बंडाशी कमी अधिक प्रमाणात सामील नसलेली एकही व्यक्ती सापडू शकली नसती." [३९]

दाजी कृष्ण पंडितांनी नेमलेल्या मामलेदाराला भुदरगडच्या गडकऱ्यांनी किल्ल्यावर घेण्याचे नाकारले आणि या बंडाची २२ जूलै १८४४ रोजी सुरुवात झाली. सामानगड येथेही जुलै १८४४ मध्येच बंडाचे निशाण उभारले. गडकऱ्यांनी किल्ल्याची दारे बंद केली, आणि सरकारी अधिकाऱ्यांना आत येण्यास बंदी केली. येथील बंडाचे नेतृत्व मुख्यतः रामजी जाधव, दौलतराव घोरपडे, बापुजी बाजीराव सुभेदार, गोविंद व्यंकोजी फडणीस इत्यादींच्या कडे होते. पोलिटिकल एजंट रीव्हज याने गडकऱ्यांना शरण येण्याचे आव्हान केले. पण गडकरी शरण न आल्याने, किल्ल्यावर हल्ला करण्यात आला. व शेवटी सामानगड इंग्रज फौजेच्या हाती १३ ऑक्टोंबर १८४४ रोजी पडला.

सामानगडला इंग्रजी फौजेचा वेढा पडला होता. त्याच सुमारास भुदरगडच्या गडकऱ्यांनी ही इंग्रजी सत्ता नाकारल्याचे जाहीर केले. भुदरगडच्या गडकऱ्यांना सुभाना निकम मदत करीत होता. पण शेवटी भुदरगडचा किल्ला ही इंग्रजाच्या ताब्यात गेला. बाबाजी आयरेकर आणि इतर बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांना इंग्रज अधिकाऱ्यांनी फोडण्याचा प्रयत्न केला. आणि शरण आल्यास माफी मिळेल असे कळविले. पण आयरेकरांनी त्यासंबंधीचा फायदा घेऊन किल्ल्यावरुन पलायन केले. त्यांनी भुदरगडाच्या बंडाचे लोण पन्हाळगडाला पोहचविले. तेथील गडकऱ्यांना उठावाची कल्पना दिली. पन्हाळगडाच्या गडकऱ्यांनी ही या बंडात सहभाग घेतला. त्यांनी काही इंग्रज अधिकाऱ्यांना पकडून ठेवले. त्यात 'कर्नल ओव्हन्स' नावाचा साताराचा रेसिडेंट

होता. दक्षिण महाराष्ट्रात यास कमिशनरच्या जागी त्याची नेमणूक झाली होती. म्हणून तो साताराहून काही लोकांनिशी जात असताना वाटेत बंडवाल्यांनी त्याला पकडून पन्हाळगडावर कैदेत ठेवले.[४०] पुढे गडकऱ्यांनी ओव्हन्स यांना सोडून दिले.[४१] भुदरगड आणि पन्हाळगड या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी बंड झाल्यामुळे इंग्रजांच्या फौजेची खूपच धावपळ झाली. पन्हाळयासारखा किल्ला शत्रूला जिंकता येणार नाही, अशी गडकऱ्यांची कल्पना होती. पण २७ नोव्हेंबर रोजी इंग्रजांच्या फौजेने पन्हाळगडावर माऱ्याच्या जागा शोधून काढून किल्ल्यावर तोफांचा भडिमार केला. त्याच काळात भुदरगडही इंग्रजांनी मिळवल्याची बातमी आली. त्यामुळे पन्हाळयाच्या गडकऱ्यांनी पावनगडचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला होता. पण इंग्रजी फौजांनी पावनगडाचा ही ताबा मिळवला. त्यामुळे पन्हाळगडाच्या गडकऱ्यांना माघार घ्यावी लागली.[४२] गडाचा ताबा इंग्रजांच्या हाती गेला.

पन्हाळगडाच्या गडकऱ्यांचा पराभव झाला. बाबाजी आयरेकर आणि दुसरे सत्तर मुख्य बंडवाले पन्हाळगडाच्या हल्ल्यात मारले गेले. पन्हाळगडाच्या आसपासच्या प्रदेशात इंग्रजी फौजेच्या टोळया होत्या. त्यांनी इतर गडकरी पळून जात होते त्यांस कैद केले.[४३]

पन्हाळगडाच्या पाठोपाठ रांगणा व विशाळगड हे किल्ले इंग्रजाच्या ताब्यात आले. कोल्हापूर शहरात ही उठावाचे लोण मोठया प्रमाणात पसरले होते. कोल्हापूर शहराच्या उठावात प्रमुख दिनकरराव गायकवाड, रावजी वाकनीस, सईबाई उर्फ दिवाणसाहेब यांचा सहभाग होता. बंडवाल्यांनी राजवाडा बंद करुन शहरभर सर्वत्र पहारे बसविले होते. बऱ्याच कैद्यांची सुटका करण्यात आली. पण या उठावाचा प्रभाव काही काळापुरता टिकला कारण बेळगाव व धारवाडहून इंग्रजांच्या फौजा आणखी मागवण्यात आल्या व त्यांनी हा उठाव दडपून टाकला. इंग्रजांना हा उठाव दडपून टाकण्यासाठी कागलकरांनी मदत केली होती. त्या संदर्भाचा उल्लेख 'कर्नल औटरॅम' याने 'गुलाम गौस' यांना पाठविलेल्या पत्रात असा केला आहे. "गुलाम गौससाहेब खानबहादूर निसबत सुंदराबाई साहेब घाटगे यास कर्नल औटरॅम याचा सलाम, कोल्हापूर इलाख्यात बंडाई होऊन मुख्य कारभारी यावर गर्दी जाहली. त्या बंडाईचे

बंदोबस्ताची तजवीज चालत असता त्या तजविजीचे कामात प्रथम कागल व चिंचवाड मुक्कामी आम्हांस मदत दिली. नंतर कोल्हापूरास आपणास बरोबर आणले. तेथेही या बंदोबस्ताच्या कामात आपणाकडून मदत होत गेली त्यानंतर मेहेरबान रेसिडेंट साहेब यासी पन्हाळा व पावनगड येथील गडकरी यांनी अटकाव केला. त्यांस तेथून आणविण्याच्या कामातही आपण मेहनत करीत होता. .........”[४४]

हे बंड मोडून काढण्यास इंग्रजांना पाच महिने लागले. आणि त्यासाठी पंधरा लाख रुपये खर्च आला. हा खर्च कोल्हापूर राज्यावर बसवून वसूल करण्यात आला.

## उठावाच्या अपयशाची कारणे :—

इ. स. १८४४ चे गडकऱ्यांचे हे बंड अपयशी ठरले, याची कारणे अशी होती. या उठावाला योग्य नेतृत्व लाभले नाही. एका ठिकाणच्या उठावाचा संबंध दुसऱ्या ठिकाणच्या उठावाशी जोडता येईल, असे सूत्रही कोणी निर्माण करु शकले नाही. तसेच या उठावात विस्कळीतपणा, फुटीरपणा शेवटी फितुरी अशा विविध कारणांनी उठावाला एकजिनसीपणा आणि संघटीतपणा लाभला नाही. त्यातच अपुरी साधने आणि अपुरे बळ यांचीही भर पडली.

## उठावाचे परिणाम :—

इ. स. १८४४ च्या बंडाचे परिणाम फार खोलवर होते. दिनकरराव गायकवाड व रावजी वाकनीस यांच्यावर बंडात सामील असल्याचा आरोप होऊन त्यांना अशीरगडावर कैदेत ठेवण्यात आले. त्यांची उत्पन्ने सरकारात खालसा केली गेली. तसेच खानविलकर, घोरपडे, सर्जेराव इत्यादींना शिक्षा झाल्या, सईबाई उर्फ दिवाणसाहेब यांनी बंडवाल्याना सहकार्य केल्याचा पुरावा मिळाल्यावरुन त्यांना ही कोल्हापूराहून काढून पुण्यास ठेवण्यात आले. व दरमहा पाचशे रुपयांची नेमणूक करुन दिली. गडकरी वगैरे सुमारे अडीचशे लोकांवर बंडात सहभाग घेतल्याचा गुन्हा सिध्द होऊन त्यांना शिक्षा देण्यात आल्या. तसेच त्यांच्या जमीनी जप्त करण्यात आल्या.

अशा प्रकारे इ. स. १८४४ मध्ये घडून आलेल्या उठावाचा बंदोबस्त करण्यात आला. या उठावाशी ज्यांचा दुरान्वयाने का होईना संबंध आहे. असा इंग्रजांना संशय


आला त्या सर्वांना शिक्षा देण्यात आल्या. बाबासाहेब महाराज चौदा वर्षाचे होते, त्यामुळे त्यांच्यावर प्रत्यक्ष बंडात भाग घेतल्याचा आरोप करता येणे शक्य नव्हते. त्यामुळे कोल्हापूरच्या गादीचे खालसा करण्याचे संकट तेंव्हा टळले. बाबासाहेब महाराज आणि राजघराण्यातील त्यांचे इतर संबंधी त्यांच्या खाजगी खर्चाकरीता ८० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली. महाराजांचे मानमराबत पूर्ववत चालू ठेवण्यात आले. पण प्रत्यक्ष सत्ता मात्र पोलिटिकल सुपरिटेंडेटच्या हाती देण्यात आली. यानंतर इंग्रजाची सत्ता खऱ्या अर्थाने सुरु झाली व छत्रपती नामधारी बनले. नव्या व्यवस्थेप्रमाणे कोल्हापूरचा पहिला सुपरिटेडेंट म्हणून इ. स. १८४५ मध्ये 'मेजर ग्रॅहम' ची नियुक्ती करण्यात आली व मुलकी कारभार 'दाजीकृष्ण पंडित' यांच्या हाती देण्यात आला.

इ. स. १८४४ चा गडकऱ्यांचा उठाव हा अयशस्वी झाला. पण या उठावात कोल्हापूर राज्यातील प्रमुख किल्ल्यांची तटबंदी ही इंग्रजांनी पाडून टाकली. पन्हाळगडाचा 'चार दरवाजा' व पन्हाळगडाची तटबंदी ही बऱ्याच ठिकाणी पाडण्यात आली.[४५] यानंतर पन्हाळगडावर इंग्रजांचा ताबा राहिला, गडाच्या रक्षणासाठी थोडीशी शिबंदी आणि शंभर तोफा ठेवण्यात आल्या.[४६]

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र्य झाला. भारतातील संस्थानी प्रदेश इतर प्रदेशाशी एकरुप व्हावा अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. तिला अनुसरुन सर्व संस्थाने भारतात विलिन झाली. कोल्हापूर संस्थानही ३१ मार्च १९४९ रोजी भारतात विलिन झाले. संस्थानी व प्रशासकीय स्वतंत्र्य अस्तित्व संपले. एका अर्थाने महाराणी ताराबाईनी स्थापना केलेल्या या राज्याच्या सुमारे २५० वर्षाच्या इतिहासाचे शेवट विलिनात झाला. यानंतर पन्हाळगड एक पर्यटनाचे क्षेत्र म्हणून विकास पावले.

**पन्हाळगड एक पर्यटनाचे ठिकाण :—**

इ. स. १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थानाच्या विलिनीकरणानंतर पन्हाळगड हे ठिकाण कोल्हापूर जिल्हयातील एक महत्वपूर्ण पर्यटनाचे ठिकाण म्हणून नावारुपाला आले आहे. पर्यटकांना सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने पन्हाळयावर हॉलिडे कॅप बांधलेले आहेत. पर्यटकांना राहण्यास सर्व




**पन्हाळगड**

१. चार दरवाजा
२. पराशरतीर्थ
३. विठ्ठल -रखुमाई मंदिर
४. पराशर गुहा
५. नागझरी
६. तटबंदीतील कोठार
७. कालीबुरुज
८. पडकोट
९. भुयारी मार्ग
१०. नागफणी दरवाजा
११. सादोबा दर्गा
१२. चोर दरवाजा
१३. तालीमखाना (आलंगा)
१४. बाजीप्रभु पुतळा
१५. अंधार बाव
१६. तीन दरवाजा
१७. गोपाळतीर्थ उद्यान
१८. गायकवाड बंधू समाध्या
१९. बालेकिल्ला (अंबरखाना, धान्य कोठारे)
२०. पुसाटी बुरुज
२१. राजदिंडी
२२. राजवाडा
२३. शिवमंदिर
२४. साठमारी
२५. दौलती बुरुज
२६. दुतोंडी बुरुज
२७.वाघ दरवाजा
२८.तबक उद्यान
२९. बाजीप्रभु बुरुज
३०.सज्जाकोटी
३१. सज्जाकोटीचा पडकोट
३२.सोमेश्वर तलाव
३३. कर्पूरबाव, एस. टी. स्टँड
३४. रामचंद्रपंत अमात्य समाधी
३५. रेडे महाल
३६. छत्रपती संभाजी मंदिर दुसरे (करवीर पहिले)
३७. धर्मकोठी
३८. नायकिणीचा सज्जा

**पावनगड**

१. दक्षिण दरवाजा
२. तुपाची विहीर
३.मूर्ती नसणारे मंदिर
४. मार्कंडेय ऋषींची गुहा
५. रेडेघाटी

सुविधायुक्त छोटे बंगले बांधले आहेत. याशिवाय पन्हाळगडावर अनेक खाजगी हॉटेल्स आहेत.

सहयाद्रीची रांग, अल्हादायक वातावरण, तुटलेले कडे, विविध नद्यांची खोरी व खोलदऱ्यांनी आकर्षक बनलेला हा परिसर, पर्यटकांना आकर्षित करतो. अलीकडील काळात जंगलतोडीमुळे सृष्टीसौंदर्य जरी कमी झाले असले तरी अद्याप ही हे एक निसर्गरम्य व थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे.

पन्हाळा गावचे दोन भाग पडलेले आहेत. प्रत्यक्ष पन्हाळा किल्ला हा एक भाग, याला हुजूरबाजार असे ही म्हणतात. व किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या रविवार, मंगळवार व गुरुवार पेठा आणि इमामपुरा यांचा दुसरा भाग पडला आहे. पन्हाळा गावचा स्थानिक कारभार इ. स. १९५४ मध्ये स्थापन झालेली नगरपालिका पाहते.

## पन्हाळयावरील प्रक्षेणीय स्थळे :—

### *१) बालेकिल्ला :—*

पन्हाळागडावरील अतिशय प्राचीन वास्तू म्हणजे पन्हाळगडाच्या मध्यभागी असलेला 'बालेकिल्ला' ही होय. या भोवती अतिशय उंच भिंती बांधलेल्या होत्या. त्या भिंती आता पूर्णपणे नष्ट झाल्या असून त्यामध्ये आंबा, पेरु, फणस आणि इतर झाडांच्या राई निर्माण झालेल्या आहेत. एकेकाळी अतिशय वैभवशाली असलेला राजवाडा आता पूर्णपणे उध्वस्त झालेला आहे.

### *२) पन्हाळगडावरील बुरुज :—*

पन्हाळगडाच्या प्रत्येक मोक्याची ठिकाणी बुरुज बांधलेले आहेत. या बुरुजांचा उपयोग पहारा देण्यासाठी आणि त्यावर तोफा ठेवून गडावर हल्ला करणाऱ्या शत्रूवर मारा करण्यासाठी केला जात असे.

### *I) काली बुरुज :—*

पन्हाळगडाच्या पूर्व बाजूस असणाऱ्या या बुरुजावरुन पन्हाळा व पावनगडाच्या मधून जाणाऱ्या वाटेवर नजर ठेवता येत असे. तसेच येथे तोफ ठेवण्याच्या व्यवस्थेमुळे

यास वेगळे महत्व प्राप्त झाले आहे. या बुरुजात चक्रकार खंदक खोदलेला असून त्यामुळे बुरुजावरील तोफ नव्वद अंशाच्या कोनात अगदी सहज फिरु शकत असे.

### *II) दुतोंडी बुरुज :–*

पन्हाळगडावरील या दोन तोंडी बुरुजाला दोन बाजूने चढणे आणि उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. म्हणून यास दुतोंडी बुरुज म्हणतात. बाजीप्रभू बुरुज, पुसाटी बुरुज असे पन्हाळगडावर आज ही अनेक बुरुज अस्तित्वात आहेत.

### *३) पन्हाळगडावरील दरवाजे :–*

पन्हाळगडावर एकूण सात दरवाजे असून त्यापैकी तीन दरवाजे मुख्य आहेत. यात चार दरवाजा, तीन दरवाजा व वाघ दरवाजा होत. चार दरवाज्यापैकी चौथा दरवाजा इ. स. १८४४ च्या बंडात इंग्रजानी नेस्तानाबूत केला. तसेच दरवाजा महत्वपूर्ण आहे. या दरवाज्यास कोकणी दरवाजा असे ही म्हणतात. तीन दरवाज्याचे स्थापत्य म्हणजे एक उत्कृष्ठ शिल्पच आहे. तसेच पन्हाळगडाचा वाघ दरवाजा हा या गडाच्या उत्तर बाजूस असून तो अत्यंत मजबूत बांधणीचा आहे.

### *४) पन्हाळगडावरील इमारती :–*

पन्हाळगडावर इतर गडाच्या मानाने अनेक इमारती या बांधण्यात आल्या आहेत. यात राजवाडा, सज्जाकोठी (सदर–ई–महाल), कलावंतीण (नायकिणीचा) सज्जा, रेडे महाल, धर्माकोठी इत्यादी इमारती असून त्या पाहण्यास अनेक पर्यटक येत असतात. या इमारतीपैकी रेडे महाल नावाची इमारत ही वास्तूशास्त्राचा एक उत्कृष्ठ नमूना आहे. या इमारतीचा बराचसा भाग पडलेला आहे. पण या इमारतीच्या छताचा सुंदर नक्षीकाम असलेला भाग गतवैभवाची साक्ष देतो.

### *५) अंबरखाना :–*

गडावर धान्य व इतर अन्य साहित्य ठेवण्यासाठी कोठारांची निर्मिती केली जाते. अशाच प्रकारची कोठारे पन्हाळगडावर सुस्थितीत आहे. त्यापैकीच 'अंबरखाना'



अंबरखाना

म्हणून ओळखली जाणारी वास्तू होय. अंबरखान्या व्यतिरिक्त बालेकिल्ल्यात गंगा, यमुना या नावची प्रचंड धान्य कोठारे आहेत. यात धान्य साठविले जात असे.

### *६) पन्हाळगडावरील मंदिर :—*

पन्हाळगडावर ऐतिहासिक व वैशिष्टपूर्ण अशी अनेक मंदिर आहेत. यात करवीर छत्रपती संभाजी पहिले महालक्ष्मी मंदिर, जिजाबाई मंदिर, ब्रम्हेश्वर मंदिर, दत्त मंदिर, सादोबा दर्गा, हरी हरेश्वर मंदिर, सोमेश्वर (महादेव) मंदिर, विठ्ठल—रखूमाई मंदिर इत्यादी मंदिर पाहण्यासारखी आहेत. त्यामुळे अनेक पर्यटक पन्हाळगडाला भेट देतात.

### *७) पन्हाळगडावरील इतर ठिकाणे :—*

पन्हाळगडावरील इतर ही अनेक ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. यात पराशर गुहा, तबक उद्यान, नेहरु उद्यान, पन्हाळा वस्तूसंग्रहालय इत्यादी याशिवाय गायकवाड बंधूची समाधी, रामचंद्रपंत अमात्य (हुकूमतपन्हा) यांची समाधी, यशवंतराव थोरात यांची समाधी, वीर शिवा काशिद याची समाधी इत्यादी ही पाहण्यासारख्या आहेत.

## समारोप :—

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर महाराणी ताराबाईने सत्ता आपल्या हाती घेतली. पण शाहूच्या सुटकेनंतर महाराणी ताराबाई व शाहूराजे याच्यांत यादवी युध्दाला सुरुवात झाली. यातून इ. स. १७१० मध्ये ताराबाईनी कोल्हापूर गादीची स्थापना केली. व पन्हाळगडाला कोल्हापूर राज्याची राजधानी निर्माण केली. इ. स. १७१४ मध्ये पन्हाळगडवर घडून आलेल्या सत्तांतरात संभाजी महाराज व राजसबाई हे कोल्हापूर राज्याच्या सत्तेवर आले. व महाराणी ताराबाई यांना कैदेत जावे लागले. इ. स. १७३१ च्या कराराने सातारा व कोल्हापूर राज्याच्या सीमा ठरविण्यात आल्या. करवीर संभाजी पहिले यांच्या शेवटच्या काळात जिजाबाईनी कारभार आपल्या हाती घेतला. जिजाबाईनी संभाजीराजे पहिले यांना पुत्र नसल्याने खानवटकर घराण्यातील 'माणकोजी' यास दत्तक घेऊन कोल्हापूरच्या गादीवर बसवले.

महादजी शिंदेची कोल्हापूरावर इ. स. १७७७ मध्ये स्वारी झाली होती. त्यावेळी त्याने पन्हाळगडाचा व कोल्हापूरचा ताबा मिळवण्याचा निकराचा प्रयत्न केला होता. पण हे प्रकरण सामोपचाराने मिटवण्यात आले. यशवंतराव शिंदेना पन्हाळगडावर मारण्याचा कट झाला होता, पण तो अयशस्वी ठरला. यानंतर इ. स. १७८८—८९ मध्ये राजधानी पन्हाळगडावरुन करवीर येथे आणण्यात आली. इ. स. १७९९ मध्ये पटवर्धनांची कोल्हापूरावर स्वारी झाली, तेव्हा शिवाजीराजे दुसरे यांनी पन्हाळगडाचा आश्रय घेतला होता. इ. स. १८१५ मध्ये पन्हाळयास टंकसाळ सुरु करण्यात आली होती. पुढे इ. स. १८४४ मध्ये कोल्हापूर राज्यात जो गडकऱ्यांचा उठाव झाला होता. त्यात पन्हाळगडाच्या गडकऱ्यांचा ही सहभाग होता पण हा उठाव अयशस्वी झाला.

इ. स. १९४९ मध्ये कोल्हापूर राज्याच्या विलिनीकरणा नंतर पन्हाळगड कोल्हापूर जिल्हयातील महत्वपूर्ण पर्यटनाचे ठिकाण मानले जावू लागले. अलिकडच्या काळात पन्हाळगड हे ऐतिहासिक दृष्टया महत्वाचे पर्यटनांचे स्थळ बनले आहे. शिवछत्रपतीच्या काळापासून पन्हाळगडास जे महत्वाचे स्थान प्राप्त झाले ते अद्याप ही कायम आहे.

## संदर्भग्रंथ सूची :–


१) गर्गे स. मा. – करवीर रियासत, पृ. ९७.

२) डॉ. पवार अप्पासाहेब – ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड १, पृ. ३१३ – १३८.

३) पवार अप्पासाहेब – ताराबाई पेपर्स, पृ. १५५.

४) कित्ता – पृ. १६९.

५) गर्गे स. मा. – करवीर रियासत, पृ. १५०.

६) सरदेसाई गो. स. – मराठी रियासत, खंड ५, पृ. ७५.

७) राजवाडे वि. का. – मराठयांच्या इतिहासाची साधने,
खंड ८, ले १६९, पृ. १९७ – १९८.

८) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. १५५.

९) पवार अप्पासाहेब – ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड २.

१०) डॉ. कुलकर्णी मंजिरी. – कोल्हापूर–सातारा रिलेशन्स इन द ऐटीन सेंच्युरी,
पीएच. डी. अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर, २००२,

११) कित्ता – पृ. १०९.

१२) पवार अप्पासाहेब – ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड १, पृ. ५०९.

१३) डॉ. पवार ज. – छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, पृ. ३०७ – ३०९.

१४) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. १२६ – १२७.

१५) कित्ता – पृ. १३०.

१६) पवार अप्पासाहेब – ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड २, पृ. २६९.

१७) राजवाडे वि. का. – उपरोक्त, ले १८४.

१८) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. १९९ – २००.

१९) कित्ता – पृ. १९९ – २००.

२०) कित्ता – पृ. १६८ – १७०.

२१) कित्ता – पृ. ६५.

२२) पवार अप्पासाहेब – जिजाबाईकालीन कागदपत्रे, पृ. ३२१.

२३) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. २२४ – २२५.

२४) डॉ. श्रीखंडे वि. क. – करवीर छत्रपती दुसरे शिवाजी, पृ. २८.

२५) कित्ता – पृ. २८ – २९.

२६) गर्गे स. मा. – करवीर रियासत, पृ. २२८ – २२९.

२७) मोडक बा. प्र. – उपरोक्त, पृ. ७३.

२८) कित्ता – पृ. ८७.

२९) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. २४३.

३०) श्रीखंडे वि. कमलाकर – उपरोक्त, पृ. ९२.

३१) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. २७५ – २७६.

३२) श्रीखंडे वि. कमलाकर – उपरोक्त, पृ. १०८.